# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १२/०९/२०२४ (गुरूवार) सायंकाळ

---

### प्राणांतिक अपघात

पोस्टे एमआयडीसी बोरी अंतर्गत दि. १०/०९/२०२४ चे २०:३० वा. दरम्यान ट्रॅव्हल्स क्र. एम. एच ३२/क्यु.–६६९९ चा चालक फिर्यादी नामे– साजिद मुजफ्फर अली सैय्यद वय ३३ वर्ष, रा. फ्लॅट नं. ६१२ राय गॅलक्सी अपार्टमेंन्ट कामठी रोड टेकानाका नागपुर हे वर्धा येथुन NH-361 हायवे रोडने नागपूर येथे येत असताना रात्रीचे ०८.३० वा. दरम्यान काठीयावाडी धाबा येथे ट्रक क्र. एन.एल.–०१/ए.एच २१२० चे चालकाने रात्रीचे वेळी अंधारात रोडवर आपले ट्रक धोकादायकरित्या उभा करून त्याचा पल्ला खोलुन ठेवुन कोणतेही सुरक्षात्मक उपाय न करता ट्रकचे इंडीकेटर, पार्कींग लाईट ब्रेक लाईट बंद ठेवुन रिफलेक्टर न लावता ट्रक रोडवर उभा करून ठेवल्यामुळे ट्रॅव्हल्स क्र. एम. एच ३२/क्यु.–६६९९ चा अपघात होवुन ट्रॅव्हल्स मधील प्रवाशी **मनीश सुरेश पवार वय १८ वर्ष रा. दिघोरी नागपुर** याच्या मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– साजिद मुजफ्फर अली सैय्यद वय ३३ वर्ष, रा. फ्लॅट नं. ६१२ राय गॅलक्सी अपार्टमेंन्ट कामठी रोड टेकानाका नागपुर यांचे रीपोर्ट वरून पोस्टे एमआयडीसी बोरी येथे कलम २८५, १०६(१) भान्यास अन्वये गुन्हा नोंद केला असुन ट्रक क्र. एन.एल.–०१/ए.एच २१२० च्या चालकाचाएमआयडीसी बोरी पोलीस शोध घेत आहे.

### अकस्मात मृत्यु

पोस्टे खापा अंतर्गत मौजा गुमगाव माईन खापा येथे दिनांक  १९/०९/२०२४ चे ०९.३० वा. दरम्यान यातील मृतक नामे– गौरीशंकर हरिचंद पालेवार, वय ३९ वर्ष, रा. गुमगाव माईन खापा याने आपले राहते घरी **राहते घरी** गुमगाव माईन क्वार्टरवर कोणत्यातरी अज्ञात कारणावरून गळफास घेतला. मृतक यास आजूबाजूच्या लोकांनी माईन्स हॉस्पीटल नागपूर येथे पुढील उपचाराकरीता नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजेश्वर रामलींगम नायडु वय ५९ वर्ष रा. गुमगाव माईन खापा यांचे रीपोर्ट वरून पोस्टे खापा येथे मर्ग क्र. ३३/२४ कलम १९४ बी.एन.एस अन्वये नोंद करण्यात आला आहे.

## बेला पोलीस यांची अवैध्य रेती वाहतुक करणाऱ्यावर धडक कार्यवाही

बेला पोलीस यांनी दि. १२/०९/२०२४ चे रात्री २३/३० वाजेदरम्यान गोपनीय माहीती मिळवुन अवैध्य व विनापरवाना (रॉयल्टी) रेती वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टर मुंडा क्र. MH 40 BG-5206 व त्याला लागुन ट्रॉली क्र. MH 40 CD 2612 चा चालक नामे — संदीप रमेश पुरके वय ३४ वर्ष रा सालईराणी ता. उमरेड जि. नागपुर हा प्रवीन झेरॉक्स बेला येथे अवैध्य व विनापरवाना वाहतुक करीत असताना मिळुन आल्याने सदर आरोपीविरूध्द व नमुद ट्रॅक्टर मालक नामे गजानन पांडुरंग दांडवे वय ५० वर्ष रा. वार्ड क्र. ६ बेला ता. उमरेड जि. नागपुर यांच्याविरूध्द कलम ३०३(२), ४९ बि.एन.एस. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६, सहकलम ४, २१ खाण आणि खनिजे (विकास आणि नियमन) अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान पासुन प्रतिबंधक अधिनियम १९८४ अन्वये कायदेशीर कार्यवाही करून एकुण १) एक सोनालीका कंपनीची निळया रंगाची ट्रॅक्टर मुंडा क्र. MH 40 BG5206 किंमती अंदाजे ३,५०,०००/—रू. २) एक निळया रंगाची ट्रॉली क्र. MH 40 CD 2612 किंमती अंदाजे १,००,०००/—रूपये ३) ०१ ब्रास रेती ५०००/— रूपये असा एकुण ४,५५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. सहायक पोलीस अधिक्षक उपविभागीय पोलीस अधिकारी श्री दिपक अग्रवाल सा. यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक श्री सी.बी. चौहान, पोउपनि खंडेराव बोळगीर, पोउपनि संतोष चव्हाण, स. फौ. तुकाराम कुनघाटकर, पोअं. ओम राठोड, पोशी श्रीधर कुलकर्णी यांनी केली आहे.

## अवैधरीत्या मोहाफुल दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ११/०९/२०२४ रोजी पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, कळमेश्वर हद्दीतील मौजा ब्राम्हणी फाटा कळमेश्वर येथे बजाज पल्सर क्र. एम.एच ४० सिपी ४८७७ ने मोहाफुल दारूची अवैध वाहतूक होत आहे. अशा माहिती वरून बजाज पल्सर क्र. एम.एच ४० सिपी ४८७७ ने अवैद्यरीत्या मोहाफुल दारूची वाहतूक करणाऱ्या इसमास पेट्रोलींग दरम्यान थांबवुन विचारपुस केली असता **आरोपी नामे— अमित मधु पवार, वय ३१ वर्ष, रा. चिंचभवन चौदा मैल ता. कळमेश्वर** याचे जवळ असलेल्या काळया रंगाच्या सॅग बॅगची **व** त्याच्या ताब्यातील बजाज पल्सर क्र. एम.एच ४० सिपी ४८७७ च्या मागच्याबाजूला बांधलेल्या काळया रंगाच्या सॅग बॅगची पाहणी केली असता दोन्ही बॅगमध्ये मोहफुल दारू ६० लिटर किंमती ३०००/— रू आणि १ बजाज पल्सर क्र. एम.एच ४० सिपी ४८७७ किंमत १०,५००० असा एकुण १०८०००/— रू चा मुद्देमाल अवैधरीत्या विनापरवाना मिळुन आला. आरोपीविरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे कलम ६५ ई मदाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोनि मनोज काळबाडे, सफौ सुनिल मिश्रा, पोना दिनेश गाडगे, पोलीस अंमलदार हेमत बांबुळकर यांनी पार पाडली.

## अवैध दारूची वाहतूक व विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ११/०९/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनीय बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, मौजा केळवद बाजारचौक येथे एक इसम हा अवैधरीत्या गाडी उभी करून आपली टी.व्ही एस मोपेड ज्यूपीटर स्कुटी गाडी क्र. एम.एच–४०/सी.डब्लू– ५६०६ गाडीच्या डीक्कीमध्ये अवैध दारू बाळगुन दारूची विक्री करीत आहे. अशा माहिती वरून पोस्टे केळवद येथील स्टाफ यांनी मौजा केळवद बाजारचौक येथे नाकाबंदी करून टी.व्ही एस मोपेड ज्यूपीटर स्कुटी गाडी क्र. एम.एच–४०/सी.डब्लू– ५६०६ चा चालक **आरोपी नामे– प्रशांत वासुदेव वसु, वय ३५ वर्ष रा–वार्ड क्र ०२ केळवद तह– सावनेर जि. नागपुर** याचे गाडीची दारूबाबत झडती घेतली असता त्याचे ताब्यातून ०१) देशी दारु भिंगरी संत्रा नं ०१ च्या ३६ निपा प्रत्येकी १८० एम.एल. एकुण ६४८० एम.एल. ने भरलेल्या प्रत्येकी निप ७०/–रु. प्रमाने एकुण किंमती २५२०/– रु (२) देशी दारु भिंगरी संत्रा नं ०१ च्या ७२ निपा प्रत्येकी ९० एम.एल. एकुण ६४८० एम.एल. ने भरलेल्या प्रत्येकी निप ३५/– रू प्रमाने एकूण कींमती २५२०/– रू ३) टी व्ही एस ज्यूपीटर स्कूटी क्र एम एच ४० सी उब्लू ५६० कींमती ९०,०००/– असा एकूण ९५०४०/– रू चा मुद्देमाल अवैधरीत्या विनापरवाना मिळुन आला. आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे कलम ६५ ई मदाका. प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील ठाणेदार सपोनि अनिल राउत, पोहवा मोरेश्वर चलपे, पोलीस अंमलदार अर्नव भांगे यांनी पार पाडली.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

दिनांक १२/०९/२०२४ चे ०४/१५ वा दरम्यान पोस्टे खापा येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, अंतर्गत मौजा जवाहर टी पॉईन्ट खापा येथे अवैधरीत्या जनावरांची वाहतूक होत आहे. अशा माहिती वरून घटनास्थळी नाकाबंदी केली असता एम. एच.–४०/ सीटी –१७१३ चा चालक आरोपी नामे फिरदोश मिर्जा बेग रा. पीली नदी संगम नगर नागपुर व क्लिनर शाहरुख शहा रा. हमीदनगर पीली नदी नागपुर असे त्यांचे ताब्यातील आयसर कंपनीचा एम.एच.–४० सीटी १७१३ यातुन एकुण ८ गोवंश जनावरे (बैल) यास अत्यंत क्रुरपणे व निदर्यतेने वाहनात कोंबुन वाहतुक करतांना मिळुन आले. जनावरांची पाहणी केली असता त्यातील एक जनावर जखमी अवस्थेत मिळुन आले. आरोपीकडुन विचारपुस दरम्यान अशी माहिती मिळाली की, जनावरांची कत्तल करुन मास विक्री करण्याच्या उददेशाने जनावरांची वाहतूक करण्यात आली आहे. आरोपीतांविरूद्ध पोस्टे खापा येथे कलम ५ अ(१), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६, सहकलम ११(१), ११(१) डी प्राणी छळ प्रतिबंधक अधिनीयम १९६० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीतांकडुन एम.एच.–४० सीटी १७१३ किंमती ७,००,०००/–रू., ८ जनावरे (बैल) प्रत्येकी १५०००/–रू. प्रमाणे १२०,०००/–रू. असा एकुण ८,२०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापा येथील ठाणेदार पोनि विशाल गिरी, पोउपनि सचिन जंगम, पोअं पन्नालाल बटाउवाले यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**